श्री विठ्ठलराव जोशी चॅरिटीज ट्रस्ट संचालित

भ. क. ल. वालावलकर ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाचे

# श्रीक्षेत्र डेरवण वार्तापत्र

मार्च २०२५ | वर्ष – १३ वार्षिक क्रीडास्पर्धा विशेषांक | पाने १२ | Regn. No. - MAHMAR/2022/86035

## ‘डेरवणमुळे राज्यासह देशाचे नाव उंचावेल !’
## – अर्जुन व द्रोणाचार्य पुरस्कार विजेत्या दीपाली देशपांडे



*प्रमुख पाहुण्या दीपाली देशपांडे यांचे स्वागत करताना उद्योजक कमलेश जोशी, उजवीकडे अजित गाळवणकर*

डेरवण क्रीडासंकुलात श्री विठ्ठलराव जोशी चॅरिटीज ट्रस्टतर्फे, श्रीशिवजयंतीनिमित्त अकराव्या वार्षिक क्रीडा महोत्सवाचे आयोजन दि. १० मार्च ते १७ मार्च २०२५ या कालावधीत करण्यात आले होते. या क्रीडा महोत्सवात ॲथलेटिक्स, फुटबॉल, टेबल टेनिस, बास्केटबॉल, जिम्नॅस्टिक्स, योग, खोखो, कबड्डी, जलतरण, लंगडी, मल्लखांब, नेमबाजी, धनुर्विद्या, बॅडमिंटन, व्हॉलिबॉल, वॉल क्लाइंबिंग, कॅरम आणि बुद्धिबळ अशा १८ क्रीडाप्रकारांचा समावेश करण्यात आला होता.

अर्जुन पुरस्कार(२००५) व द्रोणाचार्य पुरस्कार(२०२४) विजेत्या तसेच ऑलिंपियन स्वप्नील कुसाळे यांच्या प्रशिक्षिका श्रीमती दीपाली देशपांडे यांच्या उपस्थितीत या क्रीडामहोत्सवाचा शानदार शुभारंभ क्रीडासंकुलात त्यांच्याच हस्ते क्रीडाध्वजारोहणाने झाला. श्रीमती देशपांडे यांच्यासमवेत या वेळी उद्योजक कमलेश जोशी, रुग्णालयाच्या संचालिका डॉ. सुवर्णा पाटील, शिक्षण संचालिका शरयू यशवंतराव, राष्ट्रीय टेबल टेनिसपटू अजित गाळवणकर, महाराष्ट्र खो-खो असोसिएशनचे संदीप तावडे, एसव्हीजेसीटीचे क्रीडा संचालक श्रीकांत पराडकर, श्री. योगेश विचारे यांच्यासह अनेक मान्यवर या वेळी उपस्थित होते. यानंतर राज्यगीत गायन झाले. शिव-समर्थगड येथे श्री. उदयराज कळंबे, अध्यक्ष, रत्नागिरी जिल्हा शारीरिक शिक्षण शिक्षक असोसिएशन, यांच्या हस्ते क्रीडामशाल प्रज्वलित करून ‘एसव्हीजेसीटी’ इंग्रजी माध्यमाच्या शाळेतील क्रीडापटूंनी ती मशाल क्रीडासंकुलात आणल्यावर, मुंबई विद्यापीठातील सुवर्णपदक विजेता क्रीडापटू शिवा माळी यांच्या हस्ते क्रीडाज्योत प्रज्वलित करण्यात आली.

या वेळी उद्घाटन समारंभाचे आयोजन कबड्डी/खो-खोच्या आच्छादित क्रीडांगणावर करण्यात आले होते. तेथील व्यासपीठावर सर्व सन्मान्य मंडळी स्थानापन्न झाल्यावर सूत्रसंचालिका अश्विनी खांडेकर आणि सोनल सकपाळ यांनी

सर्वांचे स्वागत करून प्रमुख पाहुण्यांचा परिचय करून दिला.

प्रमुख पाहुण्या दीपाली देशपांडे यांनी नेमबाजीला १९८८पासून सुरुवात केली. ३६ वर्षांच्या आपल्या दीर्घ कारकिर्दीत त्यांनी देशातील सर्व महत्त्वाच्या स्पर्धांमध्ये उच्च यश संपादन केले. अथेन्स ऑलिंपिक्स (२००४)मध्ये त्यांनी नेमबाजीत देशाचे प्रतिनिधित्व केले. २००५मध्ये त्यांना अर्जुन पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. महाराष्ट्र सरकारने त्यांना १९९५मध्येच छत्रपती पुरस्काराने गौरवले आहे. सन २०१२ ते २०१९ या कालावधीत त्यांनी ज्युनिअर राष्ट्रीय नेमबाजी पथकाच्या मुख्य प्रशिक्षकपदाची जबाबदारी सांभाळली. २०१९ ते २१पर्यंत त्या राष्ट्रीय संघाच्या 'हाय परफॉर्मन्स' कोच होत्या. पॅरिस ऑलिम्पिक २०२४मध्ये नेमबाजीत कांस्यपदक विजेता स्वप्नील कुसळे याच्या त्या २०१३पासून प्रशिक्षक आहेत. २०२४मध्ये त्यांनी प्रशिक्षक म्हणून केलेल्या कामगिरीबद्दल द्रोणाचार्य पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. अंजुम मौडगील, अखील शेओरान, सिफ्त् कौर सामरा, अर्जुन बबुता, श्रीयंका सदंगी अशा अनेक जागतिक पातळीवर उत्तम कामगिरी करणाऱ्या नेमबाजांना त्यांनी घडविले आहे. महाराष्ट्र रायफल असोसिएशनच्या त्या कार्यकारिणी सदस्य आहेत. नॅशनल इन्स्टिट्युट ऑफ स्पोर्ट्सने तयार केलेल्या प्रशिक्षकांसाठीचा अभ्यासक्रम आखण्यात त्यांनी मोलाची कामगिरी बजावली आहे. उद्योजक कमलेश जोशी यांनी पुष्पगुच्छ, स्मृतिचिन्ह देऊन त्यांचा सत्कार केला.

क्रीडा संचालक श्री. श्रीकांत पराडकर सर्व उपस्थितांचे स्वागत करून आपल्या प्रास्ताविक भाषणात म्हणाले, ''... एस. व्ही.जे.सी.ट्रस्टतर्फे शिवजयंतीनिमित्त अकराव्या वर्षी 'डेरवण युथ गेम्स' २०२५चे आयोजन करण्यात आले आहे. सहा सांघिक आणि बारा वैयक्तिक क्रीडाप्रकारातील १८ वर्षांखालील पाच वयोगटासाठी आयोजित केली जाणारी स्पर्धा ही क्रीडाक्षेत्राचे आकर्षण झाली आहे. ५३०० खेळाडूंनी नोंदविलेली online entry हे त्याचेच द्योतक आहे.

शालेय वयोगटाच्या खेळाडूंना 'ऑलम्पिक' दर्जाच्या भौतिक क्रीडा सुविधा वापरण्याची संधी मिळावी, त्यांच्यातील कौशल्यास पारखून घेण्यासाठी स्पर्धा मिळावी यासाठी संस्थेने अंतरराष्ट्रीय दर्जाच्या क्रीडासंकुलाची स्थापना केली आहे. राज्यातील, तसेच देशातील उदयोन्मुख खेळाडू या मैदानावर येऊन खेळावेत व देशासाठी अनेक पदके जिंकावीत, त्याचबरोबर बळकट व आरोग्यदायी क्रीडासंस्कृतीची पायाभारणी व्हावी, ही ट्रस्टची क्रीडासंकुल उभे करण्यामागील उद्दिष्टे आहेत. याचबरोबर सहभागी खेळाडूंना स्वच्छता व स्वयंशिस्त याचेही धडे येथे दिले जातात.




*डावीकडून – शरयू यशवंतराव, डॉ. सुवर्णा पाटील, दीपाली देशपांडे, कमलेश जोशी, अजित गाळवणकर, संदीप तावडे, श्रीकांत पराडकर, सूत्रसंचलन अश्विनी खांडेकर आणि सोनल सकपाळ*

"every champion was once a contender, who refuses to give up' या इंग्रजी म्हणीप्रमाणे, फक्त मैदान तयार करून न थांबता विविध स्पर्धा तसेच प्रशिक्षण शिबिरे येथे अव्याहतपणे जल्लोषात संपन्न होत आहेत. मला सांगताना अभिमान वाटतो की या शैक्षणिक वर्षात आपल्या क्रीडासंकुलात ५ राज्यस्तरीय, ४ विभागस्तरीय आणि तब्बल १२ जिल्हास्तरीय स्पर्धा अत्यंत चुरशीने पार पडल्या. दरवर्षी आवर्जून आयोजित करण्यात येणारे कबड्डी, खो-खो, ॲथलेटिक्स, जलतरण, फुटबॉल, नेमबाजी अशा विविध खेळांच्या प्रशिक्षण शिबिरांचेही यशस्वी आयोजन संकुलात करण्यात आले. गुणवंत खेळाडू घडविणे, आणि आपल्या तंदुरुस्तीविषयी जागरूक असलेली आरोग्यसंपन्न पिढी घडवणे हादेखील ट्रस्टचा हेतू आहे. मुलांनी अभ्यासाबरोबर मैदानावर यावे, भरपूर मैदानी खेळ खेळावे, सुदृढ व्हावे आणि अभ्यास व खेळ याची सांगड घालत पुढे जावे, यशाने हुरळून न जाता आणि अपयशाने नाउमेद न होता ध्येयाकडे वाटचाल करावी असा संस्थेचा प्रयास आहे. मुलांना बाराही महिने भरपूर खेळता यावे, त्यांना अतिवृष्टी, प्रचंड ऊन, वारा यांचा अडथळा होऊ नये म्हणून संस्थेमार्फत भारतातील पहिले वहिले ९० X ५० मीटरचे इनडोअर स्टेडियम उभारण्यात आले आहे.




*क्रीडा संचालक श्रीकांत पराडकर प्रास्ताविक करताना*




शरयू यशवंतराव आपले विचार व्यक्त करताना




कमलेश जोशी आपले विचार व्यक्त करताना

या मैदानावर मुले खो-खो, कबड्डी, लंगडी तसेच धनुर्विद्या या खेळांचा सराव बारा महिने करू शकतील. हा अभिनव प्रकल्प क्रीडासंकुलाचा वाटचालीतील महत्त्वाचा टप्पा ठरला आहे.

आपल्या या क्रीडासंकुलाला विविध खेळातील आंतरराष्ट्रीय स्तरावर देशाचे नाव करणाऱ्या अनेक नामवंत खेळाडूंनी भेट दिली आहे. उदाहरण द्यायचे झाले तर अंजली भागवत, निखिल कानिटकर, मधुरा तांबे, ललिता बाबर, कविता राऊत, कालिदास हिरवे इत्यादी नावे सांगता येतील. तसेच आपल्या या क्रीडासंकुलात भारतीय ऑलिम्पियन खेळाडू ललिता बाबर, कविता राऊत, कालिदास हिरवे यांनी सराव देखील केला आहे.''

शिक्षण संचालिका शरयू यशवंतराव यांनी खेळ, व्यायाम आणि अभ्यास याचे संतुलन कसे राखावे हे विशद केले. त्या म्हणाल्या,''खेळ म्हणजे केवळ शरीराला सक्षम करण्याचे साधन नव्हे तर ती एक जीवनशैली आहे. तिथे मेहनत, स्वयंशिस्त, चिकाटी, सहकार्य, आत्मविश्वास आणि जिद्दीचे धडे शिकायला मिळतात. खेळ केवळ विजयाचा आनंद देत नाही तर पराजयाने येणाऱ्या निराशेचे रूपांतर आत्मविश्वासात कसे करावे हेही शिकवतो केवळ शरीराचा नव्हे तर मनाचाही विकास खेळामुळे होतो. यशस्वी होणे म्हणजे केवळ पदके मिळवणे नव्हे. प्रयत्न आणि सातत्य हे महत्त्वाचे आहे.

आरोग्य संचालिका डॉ. सुवर्णा पाटील म्हणाल्या, ''खेळाप्रती विद्यार्थ्यांचे आकर्षण वाढावे ह्याकरता त्याचे महत्त्व आधी जाणून घेतले पाहिजे. नियमित खेळल्यामुळे सगळ्यात आधी आपल्या हृदयाचा रक्त पुरवठा वाढतो. बालपणापासून जर खेळात राहिले तर वाढ होताना, जर शरीर म्हणजे एक गाडी आहे असे समजले तर तारुण्यात पदार्पण करताना शरीर गियर बदलत असते कारण वाढ ॲक्सिलरेट होत असते . त्याच वेळी हे अक्सिलरेशन खेळामुळे होते आणि मग मात्र ही शरीराची गाडी विनासायास ८०च्या पुढे आरामात जाऊ शकते. गंमत वाटेल पण खेळामुळे इन्फेक्शनचे प्रमाण कमी होते कारण आपली प्रतिकार शक्ती वाढते. सुदृढ फुप्फुसे श्वासवाहिन्यातून जंतू बाहेर टाकण्याचे काम कार्यक्षमतेने करतात

तुम्ही इथे डेरवण स्पोर्ट्स अकादमीमध्ये आला आहात तर इथल्या वातावरणाचा आस्वाद घेणार आहात. इथला फेमस वडापाव खाणार आहात. मनसोक्त खेळून बक्षिसेही मिळवणार आहात. पण त्यापलीकडे जाऊन जर तुम्ही नियमित खेळत राहिलात तर हृदय खुश होणार आहे, तन्दुरुस्त होणार आहे!

श्री. कमलेश जोशी यांनी क्रीडापटूंसमोर एक महत्त्वाचा मुद्दा मांडला. खेळामध्ये जर यश मिळवायचे असेल तर त्यासाठी




डॉ. सुवर्णा पाटील आपले विचार व्यक्त करताना




प्रमुख पाहुण्या दीपाली देशपांडे खेळाडूंना मार्गदर्शन करताना



*हर्ष बागवे खेळाडूंना 'क्रीडा शपथ' देताना*



*दीपाली देशपांडे, कमलेश जोशी, संदीप तावडे खेळाडूंची ओळख करून घेताना*

आपण शिस्तीने प्रयत्न केले पाहिजेत. आणि या शिस्तीचाही भरपूर 'सराव' केला की ती अंगी बाणली जाते, आणि मग तुम्ही आयुष्यात कोणत्याही क्षेत्रात गेलात तरी ती शिस्त तुम्हाला यश मिळवून देते.

डेरवण यूथ गेम्स'चे उद्घाटन झाल्याचे औपचारिकरीत्या जाहीर करताना, डेरवणसारख्या ग्रामीण भागात आंतरराष्ट्रीय दर्जाचे क्रीडासंकुल उभारून स्थानिक खेळाडूंसह राज्यातील विविध खेळाडूंना खेळाचे व्यासपीठ उपलब्ध करून देण्याचा केलेला संकल्प कौतुकास्पद आहे. त्यामुळे राज्यासह देशाचे नाव उंचावेल यात शंका नाही असे प्रतिपादन प्रमुख श्रीमती दीपाली देशपांडे यांनी केले. श्रीमती देशपांडे यांनी स्वतःचे उदाहरण देत या क्रीडा स्पर्धांसाठी दाखल झालेल्या खेळाडूंना खेळासाठी मेहनत घेण्याचे महत्त्व पटवून दिले आणि आपले व्यक्तिमत्त्व खेळाच्या माध्यमातून अधिक प्रभावीपणे कसे मांडावे याविषयी मार्गदर्शन केले.

हर्ष बागवे या क्रीडापटूने सर्व खेळाडूंना 'क्रीडा शपथ' दिल्यावर मल्लखांब आणि योग यांची नेत्रदीपक आणि थरारक प्रात्यक्षिके झाल्यावर कार्यक्रमाची सांगता झाली.

दरवर्षी एखाद्या क्रीडाप्रकाराच्या अनुषंगाने त्याचे फोटो, तक्ते आदींच्या साहाय्याने व्यापक माहिती, विशेषत: ऑलिम्पिकच्या संदर्भात, देणारे एक प्रदर्शन भरविले जाते. या वर्षी 'जलतरण' खेळाची सांगोपांग माहिती देणाऱ्या या प्रदर्शनाचे उद्घाटन श्रीमती देशपांडे यांच्या हस्ते करण्यात आले. या वेळी उद्योजक कमलेश जोशी, क्रीडा संचालक श्रीकांत पराडकर, श्री अजित गाळवणकर आदी मान्यवर उपस्थित होते.

स्विमिंग, डायव्हिंग आणि आर्टिस्टिक स्विमिंग या प्रकाराच्या २०२४ ऑलिम्पिक स्पर्धेतील विविध गटांतील ऑलिम्पिक विजेत्यांची नावे, जन्मदिवस, देश आणि प्रत्येक प्रकारातील वैयक्तिक कामगिरी या प्रदर्शनात नमूद करण्यात आली होती. या व्यतिरिक्त एसव्हिजेसिटी स्पोर्ट्स अॅकॅडमीच्या जलतरणपटूंची माहिती आणि त्यांची उत्कृष्ट कामगिरी प्रदर्शित करण्यात आली होती.

प्रतिवर्षाप्रमाणेच याही वर्षी आठवडाभर चाललेल्या या स्पर्धेला खेळाडूंचा उत्साही प्रतिसाद मिळाला. वैयक्तिक खेळांमध्ये एकूण १९८६ (गतवर्षी १७२१) खेळाडूंनी वेगवेगळ्या वयोगटात आणि क्रीडाप्रकारात भाग घेतला. पुणे, कोल्हापूर, सांगली, सातारा, सिंधुदुर्ग आणि अर्थातच रत्नागिरी जिल्ह्यातून अपेक्षेप्रमाणे मोठ्या प्रमाणावर प्रतिसाद मिळाला. नाशिक, ठाणे, मुंबई यांचाही प्रतिसाद समाधानकारक होता. मैदानी खेळात



*ऑलिम्पिक चित्र प्रदर्शनाचे उद्घाटन करताना दीपाली देशपांडे, कमलेश जोशी, श्रीकांत पराडकर, केदार निरोखेकर आणि अन्य*



*केदार निरोखेकर दीपाली देशपांडे यांना प्रदर्शनाची माहिती देताना*

सर्वाधिक खेळाडूंनी आपला कस अजमावला. त्याचबरोबर जिम्नॅस्टिक, मल्लखांब, धनुर्विद्या, बॅडमिंटन, जलतरण आणि नेमबाजीतही उत्तम सहभाग होता. ३२६ (गतवर्षी २८५) संघांनी सांघिक क्रीडाप्रकारात आपले कौशल्य दाखविले. यामध्ये २९३२ (गतवर्षी २९०७) खेळाडू सहभागी होते. कबड्डी, खोखो, लंगडी या क्रीडाप्रकारात नेहमीप्रमाणेच जोरदार चुरस होती. एकंदरीत या वर्षी स्पर्धेत ४९१८ (गतवर्षी ४५९६) खेळाडू सहभागी झाले. खेळाडूंमध्ये मुलींचा सहभागही उत्तम आणि ट्रस्टच्या धोरणाप्रमाणे तो अधिकाधिक वाढावा यासाठी उत्तेजन देण्यात येत आहे.

वैयक्तिक क्रीडाप्रकारात मुलींची संख्या १५७९ होती. गतवर्षी मुलींचे ५० संघ सहभागी झाले होते तर या वर्षी मुलींचे संघ ११९ होते. यशस्वी खेळाडूंना १११ चषक, १०५० पदके आणि १६ लाख रुपयांची रोख बक्षिसे वितरित करण्यात आली.

या क्रीडास्पर्धा यशस्वी होण्यासाठी सुमारे तीनशेपेक्षा जास्त स्वयंसेवक अहोरात्र कष्टत होते. सहभागी खेळाडू, त्यांचे पालक यांनी या स्पर्धेच्या यशस्वी आयोजनाबद्दल समाधान व्यक्त करून दरवर्षी स्पर्धेत आवर्जून सहभागी होण्याचा निश्चय बोलून दाखविला. संपूर्ण स्पर्धा अत्यंत शिस्तीत आणि वेळापत्रकानुसार पार पडली. स्पर्धाकाळात तापमानाने उच्चांक गाठला होता तरीही खेळाडूंचा उत्साह आणि जिगर कमी झाली नाही.

संपूर्ण क्रीडानगरीत खेळाडूंच्या खानपानाची, निवासाची व्यवस्था उत्तम होती. आरोग्य आणि स्वच्छतेच्या निकषांवर काटेकोरपणे उतरणारा उसाचा रस, पौष्टिक खाद्यपदार्थ, पौष्टिक बिस्किटे, फळे, दूध आदी उपलब्ध करून दिल्यामुळे खेळाडूंकडून आणि विशेषत: पालकांकडून समाधान व्यक्त करण्यात आले. स्वयंसेवकांच्या तत्पर आणि विनम्र सेवेबद्दल अनेकांनी आपल्या भावना मुद्दाम बोलून दाखविल्या.



*दीपाली देशपांडे क्रीडाध्वजाचे आरोहण करताना*



*राज्यगीत गायन*



*क्रीडामशालीचे क्रीडांगणावर आगमन*




*क्रीडापटू शिवा माळी यांच्या हस्ते क्रीडाज्योतीचे प्रज्वलन*

# – डेरवण यूथ गेम्सचा सांगता समारंभ –




*डावीकडून – शरयू यशवंतराव, सुवर्णा पाटील, श्री. विकासराव वालावलकर, श्री. पांडुरंग चाटे (प्रमुख पाहुणे), अजित गाळवणकर, श्रीकांत पराडकर*

दि. १७ मार्च २०२५ रोजी सायंकाळी ५.३० वाजता क्रीडामहोत्सवाच्या सांगता समारंभाला सुरुवात झाली. समारंभासाठी प्रमुख पाहुणे म्हणून श्री. पांडुरंग चाटे यांना निमंत्रित करण्यात आले होते. त्यांचे समारंभस्थळी आगमन झाल्यावर शंभर मिटर धावण्याच्या स्पर्धेची विविध वयोगटांची अंतिम फेरी घेण्यात आली.

श्री. चाटे हे 'स्पोर्ट्स ऑथॉरिटी ऑफ इंडिया'चे रिजनल डायरेक्टर आहेत. २०१९ साली त्यांनी भारतीय महसूल सेवेत प्रवेश केला आणि उपायुक्त–कस्टम्स, उपायुक्त–जी.एस.टी., सहआयुक्त–न्हावाशेवा बंदर आदी अनेक महत्त्वाची पदे त्यांनी भूषविली आहेत. सध्या त्यांच्याकडे गोवा आणि दीव–दमणचाही अतिरिक्त भार आहे.

ते स्वत: क्रीडापटू असून दोरीवरच्या उड्या या प्रकारात त्यांनी केलेल्या विक्रमाची गिनीज बूक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डमध्ये नोंद झालेली आहे. पदभ्रमणाची त्यांना आवड असून 'माउंट एव्हरेस्ट'चा बेसकॅम्पचा ट्रेक त्यांनी पूर्ण केला आहे. महसूल खात्याच्या स्पर्धांमध्ये बॅडमिंटन, टेबल–टेनिस, बिलिअर्ड या प्रकारात सर्वोच्च पदके मिळवली आहेत. महसूल खात्याच्या क्रिकेट संघाचे ते कर्णधारही आहेत.

प्रमुख पाहुण्यांचे समारंभस्थानी आगमन झाल्यावर ट्रस्टचे प्रमुख विश्वस्त श्री. विकासराव वालावलकर यांनी त्यांचे पुष्पगुच्छ आणि स्मृतिचिन्ह देऊन स्वागत केले. सभामंचावर शिक्षण संचालिका शरयू यशवंतराव, आरोग्य संचालिका डॉ. सुवर्णा पाटील, क्रीडासंचालक श्रीकांत पराडकर, श्री. अजित गाळवणकर हेही उपस्थित होते. स्पर्धेच्या पहिल्या वर्षापासून प्रतिवर्षी संपूर्ण दिवस उपस्थित राहून स्पर्धेचे नियोजन करण्यात



*१०० मी अंतिम फेरी (मुले)*



*१०० मी अंतिम फेरी (मुली)*



प्रमुख पाहुणे श्री. पांडुरंग चाटे यांचे स्वागत करताना श्री. विकासराव वालावलकर


श्री. पांडुरंग चाटे यांच्या हस्ते पारितोषिक वितरण

मोलाचा वाटा उचलणारे श्री. संदीप तावडे, ज्येष्ठ क्रीडा संघटक आणि सचिव- रत्नागिरी जिल्हा ॲथलेटिक्स आणि खोखो असोसिएशन यांचा श्री. वालावलकर यांच्या हस्ते सत्कार करण्यात आल्यावर श्री. श्रीकांत पराडकर यांनी स्पर्धेचा आढावा घेतला. आपल्या भाषणात ते म्हणाले, ''दि. १० मार्च ते १७ मार्च २०२५ या कालावधीत ११व्या डेरवण यूथ गेम्सचे आयोजन करण्यात आले होते. त्यामध्ये १८ खेळांच्या स्पर्धा आयोजित केल्या होत्या. यामध्ये एकूण सुमारे पाच हजार खेळाडूंनी आपले कौशल्य पणाला लावले. सध्या चालू असलेला परीक्षांचा हंगाम लक्षात घेता येथील क्रीडा स्पर्धांना मिळालेला हा प्रतिसाद हा संस्थेचा आत्मविश्वास वाढविणाराच आहे, यात शंका नाही. विविध खेळाचे खेळाडू, तांत्रिक अधिकारी, मार्गदर्शक, विविध क्रीडा संघटनाचे पदाधिकारी आणि स्वंयसेवक अशा एकूण ७०००हून अधिक क्रीडा रसिकांनी या क्रीडास्पर्धा खऱ्या अर्थाने यशस्वी केल्या. या स्पर्धेत ११५ चषक, ११६० पदके आणि तब्बल १६ लाखांची रोख रक्कमेची पारितोषिके या वेळी खेळाडूंना वितरित करण्यात आली. या वर्षीच्या क्रीडा महोत्सवाचे उद्घाटन द्रोणाचार्य पदक प्राप्त शूटिंग खेळाच्या प्रशिक्षिका दीपाली देशपांडे यांच्या उपस्थितीत दिमाखात पार पडले. आणि आजच्या सांगता समारंभासाठी आदरणीय पांडुरंग चाटे यांची उपस्थिती आम्हा सर्वांसाठी प्रेरणादायी ठरत आहे.

स्पर्धेचा आढावा घेताना येथील वैशिष्ट्यपूर्ण असणाऱ्या इडोअर खो-खो संकुलात सर्वाधिक ५९ संघानी सहभाग नोंदवत या स्पर्धेला भरभरून प्रतिसाद दिला. महाराष्ट्रातील विविध ग्रामीण भागातील खेळाडू आवर्जून या स्पर्धत हजेरी लावण्यासाठी आले होते. ॲथलेटिक्स स्पर्धेतही ११०० खेळाडूंनी सहभाग घेतला. मल्लखांब खेळासाठी ३५६ आणि योगासन खेळासाठी १८९ स्पर्धकांनी हजेरी लावून पारंपरिक खेळाची लोकप्रियता दर्शवून दिली. ८, १० आणि १२ वर्षाखालील वयोगटासाठी स्पर्धाप्रकार वाढवून छोट्या खेळाडूंना स्पर्धात्मक वातावरणाची ओळख करून देण्यासाठीचा संस्थेचा प्रयत्न सफल झाला असे म्हटले तर वावगे ठरणार नाही. जलतरणातील पाच क्रीडाप्रकारात तब्बल १५९ खेळाडूंनी सहभाग नोंदवला. यामध्ये चार राष्ट्रीय खेळाडूंनी आपला सहभाग नोंदवला होता. आर्चरी या क्रीडाप्रकारात १२० खेळाडू सहभागी झाले होते. शालेय स्पर्धापूर्व तयारी हंगामासाठी ही स्पर्धा खेळाडू आणि प्रशिक्षकांसाठी मापदंड ठरत आहे. राज्यातील विविध भागातून आलेले खेळाडू खडतर हवामान, परीक्षेचे दिवस अशा अडथळ्यांवर मात करून स्पर्धेला आवर्जून उपस्थित होते.


श्री. पांडुरंग चाटे - अध्यक्षीय भाषण


योगेश विचारे क्रीडाध्वज पांडुरंग चाटे यांच्याकडे देताना




*पांडुरंग चाटे क्रीडाध्वज श्रीकांत पराडकर यांच्याकडे सुपूर्द करताना*

क्रीडा विश्वातील अनेक नामवंत प्रशिक्षक आणि संघटकही स्पर्धेला भेट देण्यासाठी आले होते.

स्पर्धेत सहभागी खेळाडूंना प्रत्यक्ष या पदकांना छातीवर मिरवण्याची संधी मिळाली या वेळी त्यांच्या चेहऱ्यावर उमटलेला आनंद अवर्णनीय असाच होता. स्पर्धेच्या विशेष उपक्रमात म्हणजेच ऑलम्पिक प्रदर्शनात यंदा स्विमिंगविषयी समग्र माहिती मांडण्यात आली. तेथेच मुलांसाठी मनोरंजनात्मक खेळांचे आयोजन करण्यात आले होते. याचा मुलांनी भरभरून आनंद लुटला. कोणत्याही मोठ्या स्पर्धेच्या यशस्वी आयोजनामागे सुयोग्य असे नियोजन असते. याचाच भाग म्हणजे स्पर्धेच्या पहिल्याच दिवशी पुढील वर्षी २७ फेब्रुवारी ते ६ मार्च २०२६ या कालावधीत होणाऱ्या स्पर्धेचे वेळापत्रक खेळाडूंच्या व उपस्थितांच्या माहितीसाठी लावण्यात आले.

वर्षभर या संकुलात शालेय आणि संघटनांच्या विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात येते. ५ राज्यस्तरीय, ४ विभागस्तरीय, १२ जिल्हास्तरीय स्पर्धा संकुलात यशस्वी पार पडल्या. वर्षभर येथे सराव करणाऱ्या खेळाडूंचाही आलेख मांडणे येथे योग्य ठरेल. क्रीडासंकुलातील जलतरणपटू तन्मयी जाधव हिने शालेय राज्यस्तरीय स्पर्धेत रौप्यपदक जिंकून राष्ट्रीय स्पर्धेसाठीची पात्रता मिळविली. तसेच आरोही पालखडे हिने सिंधुदुर्ग सागरी जलतरण स्पर्धेत ३ किमी अंतर पार करून रौप्यपदक जिंकले. रायफल शूटिंग या प्रकारात हर्ष बागवे याने सीबीएससी साऊथ झोन स्पर्धेत चमकदार कामगिरी करून कांस्यपदक जिंकले. तसेच सृष्टी जाधव हिने महाराष्ट्र एअर अँड फायर आर्म्स स्पर्धेमध्ये कांस्यपदक पटकाविले. मैदानी स्पर्धेत खुशी हसे हिने राज्यस्तरीय ८०० मी स्पर्धेमध्ये द्वितीय क्रमांक पटकावून भुवनेश्वर येथे झालेल्या राष्ट्रीय स्पर्धेमध्ये सहभाग नोंदविला. तसेच रोहन चौधरी याने राज्यस्तरीय १०,००० मी स्पर्धेमध्ये तृतीय क्रमांक पटकाविला.

भविष्यात डेरवण यूथ गेम्समधून स्फूर्ती घेऊन येथे उपस्थित असलेल्या तसेच क्रीडासुविधांपासून वंचित असलेल्या महाराष्ट्रातील आणि देशभरातील खेळाडूंनी, या सुविधांचा लाभ घेवून राष्ट्रीयच नव्हे तर आंतरराष्ट्रीय स्तरावर आपली मोहोर उमटविली तर खऱ्या अर्थाने या क्रीडासंकुलाच्या उभारणीचे सार्थक होईल असे आम्हाला वाटते.''

सूर्यास्ताची वेळ झाल्यावर क्रीडासंकुलातील राष्ट्रीय तिरंगा ध्वज सन्मानाने उतरण्यात आला. प्रमुख पाहुणे श्री. चाटे आणि प्रमुख विश्वस्त श्री. वालावलकर यांच्या हस्ते १०० मी धावण्याच्या स्पर्धेतील विजेत्यांना पदके देण्यात आली आणि त्यानंतर प्रमुख पाहुण्यांनी आपले विचार व्यक्त केले.

ते म्हणाले, ''... अद्भुत, अलौकिक आणि ऐतिहासिक असे डेरवण यूथ गेम्स पाहून आज खरंच मन भरून आलं. पाच हजार ॲथलीट एकत्र आणणं आणि इतक्या वेगवेगळ्या डिसिप्लिनमध्ये स्पर्धा घेणे हे इथे येईपर्यंत मला वाटत होतं की शक्य नाही. पण डेरवणने ते दाखवून दिलं. या जोषपूर्ण कार्यक्रमात मी सहभागी आहे याचा मला अभिमान वाटत आहे. एवढे काम असताना मुंबईहून मला इथे ओढून आणून तुमच्यासमोर बोलण्याची संधी देणारी अशी या पवित्र भूमीत काहीतरी विशेष शक्ती आहे.

मला वाटते भारताचे सुवर्णयुग सुरू झाले आहे. २०३६मध्ये आपण ऑलिंपिक भरविण्याच्या योजना आखत आहोत. त्या वेळी आपल्याला स्पोर्ट्सचा उच्चांक २०३६पर्यंत गाठायचा आहे. आपल्याला पुढची ही बारा वर्षं, ज्याला 'तप' म्हणता येईल ते आपल्याला करायचं आहे. बरोबर बारा वर्षांनंतर ऑलिंपिक होणार आहे आणि तळागाळातलं टॅलेंट शोधण्याची जी ही सुवर्णसंधी डेरवण देत आहे, ही म्हणजे गोल्डन टायमिंग आहे. प्रत्येक गोष्ट होण्यासाठी वेळ यावी लागते. मी सर्व ॲथलीटना सांगू इच्छितो की ह्या प्रसंगामधून स्वप्न बघा! या वयात बघितलेली स्वप्नंच खरी ठरतात. माझंच उदाहरण सांगतो. अजूनसुद्धा माझ्या गावांमध्ये १०००च्या पुढे लोकसंख्या नाही पण कधीतरी कलेक्टरची गाडी पाहिल्यानंतर इच्छा झाली होती की मलापण कलेक्टर बनायचं आहे. त्या स्वप्नपूर्तीसाठी मी अपार कष्ट केले आणि भारतीय महसूल सेवेत निवडला गेलो. असिस्टंट कमिशनर ऑफ कस्टम्स, डे. कमिशनर ऑफ जी.एस.टी. अशा विविध जागी काम केले.

पूर्वी शिक्षणाला खूप महत्त्व होतं, स्पोर्ट्सला नव्हतं, पण स्पोर्ट्स हे माझं पहिलं प्रेम. मग ते पहिलं प्रेम परत साकार करायला आयएएस बनून स्पोर्ट्स ऑथॉरिटी ऑफ इंडियामध्ये डेप्युटेशनवर आलो. पूर्वी म्हणत,'खेलेगा कुदेगा तो बनेगा खराब, पढेगा लिखेगा तो बनेगा नवाब!' आता ती मानसिकता बदलली आहे. आता आपले ऑनरेबल प्राइम मिनिस्टर साहेबसुद्धा

म्हणतात, 'खेलेगा इंडिया तो खिलेगा इंडिया.' 'फिट इंडिया तो हिट इंडिया.' 'हेल्थ इज वेल्थ.' कोरोना साथीनंतर आपल्या सगळ्यांचे डोळे उघडलेले आहेत की हेल्थ इज रियल वेल्थ. त्या उपक्रमासाठी गव्हर्नमेंट ऑफ इंडियाने 'फिट इंडिया' मिशन आणलं. खेलो इंडिया मिशन आणलं. फिट इंडिया मिशन म्हणतं, 'फिटनेस की डोस, आधा घंटा रोज.' अर्धा तास तरी आपण स्वतःच्या स्वतःला दिला पाहिजे. जगात आपण लोकसंख्येने नंबर एक आहोत. इकॉनॉमीवाईज आपण पाच नंबरला आहोत. २०२७ला आपलं लक्ष्य थर्ड लार्जेस्ट इकॉनॉमी होण्याचं आहे. पॅरिस ऑलिंपिकमध्ये आपली रँकिंग ७१वी होती. प्रत्येक गोष्टीची वेळ येत असते. त्यामुळे मी हे म्हणतोय स्पोर्ट्सचा टाईम आलेला आहे. जसे फिल्मस्टार सेलिब्रिटी होतात तसे स्पोर्ट्समनसुद्धा सेलिब्रिटी म्हणूनच लॉन्च होतात. नीरज चोप्रा, मनु भाकर, स्वप्निल कुसळे हे सेलिब्रिटी झाले आहेत. जसं आपण क्रिकेटवर प्रेम केलंय तसं आता बाकीच्याही स्पोर्ट्स डिसिप्लिनवर तेवढेच प्रेम करावं. आपल्या सर्व मुलांना मुलींना मी सांगू इच्छितो तुम्ही अशा वयामध्ये आहात की तुम्ही स्वप्न बघा आणि लक्षात ठेवा की जिंदगी की 'असली उडान अभी बाकी है। जिंदगी के कई इम्तिहान अभी बाकी है। अभी तो नापी है मुठ्ठी भर जमीन। पुरा आसमान बाकी है।' जसं मराठीत म्हणतात 'तूच आहेस तुझ्या जीवनाचा शिल्पकार.' असा मजबूत पाया घाला की त्यावर टोलेजंग इमारत उभी राहील.

ती संस्कृती मी इथे पाहिली! डेरवणचा पूर्ण कॅम्पस मी फिरून पाहिला. ही संस्कृती आणि हे सर्व जे चाललंय ते मुंबई पुण्याच्या कोणत्याच प्रकारे मागे नाहीये, हे त्याच्यापुढे आहे! मी सर्वांचे त्यासाठी अभिनंदन करतो की ज्या जिद्दीने तुम्ही सर्व टीम बांधलेल्या आहेत त्याच जिद्दीने पुढे जाऊन आपण यातून आयएएस, आयपीएस, ऑलिंपियन्स तयार करावे आणि ते होतीलच याचा विश्वास मला आज आलेला आहे. रिजनल डायरेक्टर, 'स्पोर्ट्स ऑथॉरिटी ऑफ इंडिया' म्हणून मला असं वाटतं की तुम्ही 'खेलो इंडिया अकॅडमी'सुद्धा प्रपोज करावी. ती देण्यासाठी गव्हर्नमेंट ऑफ इंडिया स्वतः पुढे होऊन आपल्याला मान्यता देईल.

आज शिवजयंतीच्या पावन दिवशी मी इथे उभा आहे. ही जी एनर्जी आहे ही मी कधीच विसरणार नाही आणि डेरवणला पण मी कधीच विसरणार नाही. ह्या इव्हेंटबद्दल सांगायचं झालं तर पाच हजार म्हणजे एक नॅशनल गेम एक्झिक्युट केल्यासारखं आहे. त्यांचं मॅनेजमेंट, त्यांचं राहणं, त्यांचं खाणं, व सपोर्ट स्टाफच सगळं बघणं हे प्रोफेशनली एक्झिक्युट करणं हे काही साधं काम नाही.

मी सरांसोबत चर्चा केली की जसं तुम्ही व्यवस्थापन छान प्रकारे करीत आहात तसंच स्पोर्ट्सला सायन्सची जोड द्या. म्हणजे वेगवेगळ्या स्पोर्ट्स सायन्सची जी क्षेत्र असतात त्यांच्यातून ॲथलीटला खूप मदत होते. सायकॉलॉजिस्ट, फिजीओथेरपिस्ट, न्यूट्रिशनिस्ट, स्ट्रेंग्थ अँड कंडिशनिंग एक्सपर्ट, मेडिकल ऑफिसर अशा सायन्सची जर सांगड आपण खेळासोबत केली तर आपण व्यावसायिक आंतरराष्ट्रीय स्पर्धक झालो असे म्हणता येईल. अशी ॲकॅडमी ही स्पोर्ट्स सायन्सला जोडून करण्यात यावी. शिक्षण आणि स्पोर्ट्स हे एकाच गुणधर्मातून जातात. दोन्हीत एकाग्रता लागते आणि दोन्हीत एकाच वेळी यश मिळवणारे अनेक जण आहेत. 'विनर्स डोंट डू डिफरंट थिंग्स. दे डू थिंग्स डिफरंटली' असं म्हणतात तसा हा प्रकार आहे. पुन्हा एकदा सर्वांचे मनापासून अभिनंदन!''

ठीक ६.४५ वाजता योगेश विचारे यांनी क्रीडाध्वजाचे अवतरण करून तो प्रमुख पाहुण्यांकडे दिला आणि प्रथेप्रमाणे त्यांनी तो पुढील क्रीडास्पर्धेसाठी क्रीडासंचालकांकडे सुपूर्द केला. क्रीडाज्योत मंदावण्यात आली आणि मैदानात इंग्रजी माध्यमाच्या शाळेच्या मुलांनी सादर केलेला सांस्कृतिक कार्यक्रम सुरू झाला. कार्यक्रमानंतर शरयू यशवंतराव यांनी सर्वांचे आभार मानल्यावर गेले सात दिवस रंगलेल्या क्रीडामहोत्सवाची सांगता झाली.






*शाळेतील विद्यार्थ्यांकडून विविध नृत्यप्रकार सादर*














BADMIN




SANIKA
04















भक्तश्रेष्ठ कमलाकरपंत लक्ष्मण वालावलकर ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, रोगनिदान व संशोधन केंद्र
श्रीक्षेत्र डेरवण - ४१५६०६, ता. चिपळूण, जि. रत्नागिरी
दूरध्वनी : Reception No. (Hospital) : 8847790149 MSW (Social worker) : 9356427731
ई-मेल : info@walawalkarhospital.com वेबसाईट : www.walawalkarhospital.com







# डेरवण यूथ गेम्स २०२६

छत्रपती शिवाजीमहाराज जयंतीनिमित्त
दि.२७ फेब्रुवारी २०२६ ते दि. ६ मार्च २०२६ या कालावधीत
श्री विठ्ठलराव जोशी चॅरिटीज ट्रस्ट क्रीडासंकुलात भव्य क्रीडास्पर्धा

## सर्व क्रीडापटू आणि क्रीडाप्रेमना सस्नेह निमंत्रण



**मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक :** श्री. विकास कमलाकर वालावलकर यांनी धनश्री ऑफसेट, ३/२०८, पत्रकार कॉलनी, कुवारबाव, रत्नागिरी येथे छापून भ.क.ल. वालावलकर ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, रोगनिदान व संशोधन केंद्र, डेरवण, पो. सावर्डे, ता. चिपळूण, जि. रत्नागिरी ४१५ ६०६ येथून प्रकाशित केले.Visit us at https://swamisamarth.com/dervan// कार्यकारी संपादिका : डॉ. सौ. सुवर्णा पाटील-९९२१२ ५१६९५,उपसंपादक : सौ. शरयू यशवंतराव-९८८१६ १९९७४, श्री. श्रीकांत पराडकर-९५८८४ ७९२२०
नोंदणी क्रमांक : MAHMAR/2022/86035